# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३ / श्रावण ६, १९४५ ( शके )**

**(१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
**(२) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री**
**(३) उद्योग मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(५) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री**
**(६) अन्न व औषध प्रशासन मंत्री**

} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २१**

---

**शिंदी ते आरव (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) येथील लोखंडी पूल दुरूस्ती दरम्यान झालेल्या अपघाताबाबत**

**(१) * ७०१०६ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंदी ते आरव (ता.महाबळेश्वर, जि.सातारा) या दुर्गम गावाला जोडणारा लोखंडी पुल दुरूस्ती दरम्यान झालेल्या अपघातात तीन ग्रामस्थ जखमी झाल्याने त्यांना कळवा-ठाणे येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केल्याचे दिनांक २२ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोयनेच्या दुर्गम भागातील शिंदी ते मोरणी हा १४ कि.मी. चा रस्ता वन विभागाच्या हरकतीमुळे प्रलंबित असल्याने दळणवळणासाठी नदीवरील उपरोक्त लोखंडी पुलावरून नागरीकांची ये-जा सुरू होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सातारा जिल्ह्यातील शिंदी, वलवण, आरवला, मोरणी, म्हाळुंगे, उचाट, वाघावळे, लामज, निवळी, अकल्पे, गाढवली आदी गावांचा रस्त्याअभावी पावसाळ्यात संपर्क तुटत असून तेथील स्थानिकांना दैनंदिन गरजांकरिता खेड येथे जावे लागते, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, सदर लोखंडी पुल हा दहा वर्षापूर्वी पडला असून त्याची अद्यापही दुरूस्ती केली नसल्याने स्थानिक नागरीकांनी स्वत:च्या स्वखर्चातून हा लोखंडी पुल दुरूस्त करण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन पूलाची दुरूस्ती, शिंदी ते मोरणी दरम्यानचा रस्ता मंजूर करणे तसेच अपघातातील जखमींना आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) शिंदी ते आरव योजना बाहय रस्त्यावरील लोखंडी पूल १२ वर्षापूर्वी पडलेला आहे. सद्यस्थितीत येथे पूल अस्तिवात नाही. तथापि ग्रामस्थ लोखंडी खांब व बांबू याचा वापर करुन ये-जा करण्याकरिता दरवर्षी तात्पुरती व्यवस्था करतात. जून २०२३ मध्ये असे करताना ३ ग्रामस्थ जखमी झाले व त्यांना प्रथमोपच्चारासाठी खेड येथे खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.
(२) व (३) हे खरे नाही. सदर शिंदी ते मोरणी हा रस्ता प्रजिमा दर्जाचा असून, रस्त्याची लांबी १४.७४ कि.मी आहे. सदर रस्त्याची लांबी खडीकरणाची आहे व यावरुन वाहतुक सुरु आहे.

सदर रस्त्याच्या कामाकरिता आवश्यक परवानगी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) शिंदी ते आरव योजना बाहय रस्त्यावरील लोखंडी पूल १२ वर्षापूर्वी पडलेला आहे. सद्यस्थितीत येथे पूल अस्तिवात नाही. तथापि ग्रामस्थ लोखंडी खांब व बांबू याचा वापर करुन ये-जा करण्याकरिता दरवर्षी तात्पुरती व्यवस्था करतात.
(५) मोरणी ते शिंदी प्रजिमा १४ या रस्त्यावर सा.क्र. कि.मी.८५/००० ते ९९/७४० या लांबीत रक्कम रु.१५००.०० लक्षचे मंजूर काम आवश्यक परवानग्या प्राप्त करुन लवकरच हाती घेण्याचे नियोजन आहे.

शिंदी ते आरव या योजना बाहय रस्त्यावर सदर ठिकाणी नवीन साकव बांधण्याकरिता रक्कम रु.५९.१५ लक्ष खर्च अपेक्षित आहे. जिल्हानियोजन समितीमार्फत मान्यता व निधी उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अंधेरी (मुंबई) येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात मागासवर्गीय विद्यार्थांना पदवीदान समारंभात अपमानास्पद वागणूक मिळाल्याबाबत**

**(२) * ६४७४५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी (मुंबई) येथील भारतीय विद्याभवन संचालित सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवीदान समारंभात काही मागासवर्गीय विद्यार्थांना प्रवेश शुल्क पूर्ण भरले नसल्यामुळे पदवी घेण्यापासून रोखण्यात आल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने जाणूनबुजून पदवी प्रमाणपत्र न दिल्यामुळे अन्य जातींच्या विद्यार्थांसमोर भेदभावाची वागणूक देऊन अपमानित केल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अभ्यासक्रमास सन २०१८ मध्ये महाविद्यालय व्यवस्थापनेच्या सूचनेनुसार मागासवर्गीय विद्यार्थांना नियोजित शुल्क भरून प्रवेश दिला होता, यानंतर ४ वर्षाच्या काळात वाढीव शुल्काबाबत विद्यार्थांना कोणतीही माहिति न देता ऐनवेळी पदवीदान समारंभाच्या अवघ्या ४ दिवस अगोदर नोटीस पाठवून वाढीव शुल्क भरण्याचा आदेश देण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठ, महाविद्यालय मागासवर्गीय कक्ष आणि समाजकल्याण आयुक्त यांना तात्काळ तक्रार करूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय खरे आहे.
(२) संस्थेच्या दि.१०.०५.२०२३ रोजीच्या पदवीप्रदान समारंभाबाबतच्या परिपत्रकात शिक्षण शुल्क भरणेबाबत नमूद अटींची पूर्तता होत असल्यासच संबंधित विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येईल, असे नमूद आहे. तथापि, अश्या स्वरुपाची विद्यार्थ्यांची तक्रार तंत्र शिक्षण संचालनालयास प्राप्त झालेली नाही.
(३) होय, खरे आहे.

संस्थेच्या दि.१०.०५.२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांना संस्थेकडून कळविण्यात आले आहे.
(४) यासंदर्भात तंत्र शिक्षण संचालनालयाकडे अश्या स्वरुपाची तक्रार प्राप्त झालेली नाही. त्यामुळे मुंबई विद्यापिठ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्याकडून सविस्तर अहवाल घेण्यात येत आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्ह्यातील शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून शाळेत अग्निरोधक यंत्रणा बसविण्याबाबत

**(३)** * **६४८५९ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील १ हजार ३७० शाळांचे अद्यापही स्ट्रक्चरल ऑडिट झालेले नसून ३५९ शाळेत अग्निरोधक यंत्रणा नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे दिनांक २३ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यासह अग्निरोधक यंत्रणा बसविण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या शाळा व्यवस्थापन व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

धुळे जिल्ह्यातील शाळांचे स्ट्रक्चरल ऑडीट झालेले नाही. परंतु त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे असे म्हणता येणार नाही तसेच ८०% शाळांमध्ये अग्निरोधक यंत्रणा आहे.

(२) आवश्यकतेनुसार स्ट्रक्चरल ऑडीट करण्याची तजवीज ठेवली आहे. तसेच उर्वरीत शाळांमध्ये अग्निरोधक यंत्रणा बसविण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गावरुन मौजे-खरोशी, दुरशेत, बळवली, ईरवाडी, कासू, पांडापूर, निगडे, आमटेम व कोलेटी (ता.पेण,जि.रायगड) या गावांकडे जाण्यासाठी सर्व्हिस रोड तयार करण्याबाबत

**(४)** * **६६०२८ श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरुन मौजे-खरोशी, दुरशेत, बळवली, ईरवाडी, कासू, पांडापूर, निगडे, आमटेम व कोलेटी (ता.पेण,जि.रायगड) या गावांकडे जाण्यासाठी सर्व्हिस रोड नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व्हिस रोड नसल्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरून या गावांकडे येताना व जाताना अपघात होवून अनेकांचे मृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपघात टाळण्यासाठी नागरीकांनी सर्व्हिस रोड तयार करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सर्व्हिस रोड तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वरील पनवेल ते इंदापूर महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

मौजे खरोशी, दुरशेत व ईरवाडी या गावांसाठी सुरक्षित वाहतुकीसाठी महामार्गावर जंक्शन प्रस्तावित आहे.

कासू गावासाठी सेवा रस्त्याचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

पांडापूर, निगडे, आमटेम व कोलेटी या गावांकडे जाण्यासाठी सेवा रस्ते प्रस्तावित आहेत.

(२) पोलिस अहवालानुसार सर्व्हिस रोड नसल्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरुन या गावांकडे येताना व जाताना अपघात झाल्याची नोंद नाही.

(३) अशी मागणी प्राप्त झालेली नाही.

(४) मुद्दा क्र.१ नुसार.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात विशेषत: मुंबईतील शिक्षण शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांना गुणपत्रे व इतर कागदपत्रे न देणाऱ्या शाळांना बालहक्क आयोगाने पाठविलेल्या नोटीसा**

**(५) * ६५०५६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक खाजगी शाळा व्यवस्थापनाकडून फी न भरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका तसेच इतर आवश्यक कागदपत्रे रोखली जात असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची गंभीर दखल घेत बाल हक्क आयोगाने मुंबईतील १५ व नाशिक शहरातील १० शाळांना नोटीसा बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाल हक्क आयोगाच्यावतीने दिनांक १२ एप्रिल, २०२३ रोजी मुंबई येथे घेण्यात आलेल्या सुनावणीत शिक्षण विभागास धोरण तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धोरण निश्चितीसंदर्भात तसेच संबंधित शाळा व्यवस्थापनांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

नाशिक व मुंबईतील शाळांबाबत अशा स्वरुपाच्या तक्रारी शासनाकडे तसेच बाल हक्क आयोगाकडे प्राप्त झाल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) संबंधित खाजगी शाळांच्या मुख्याध्यापकांना नोटिसा देण्यात आल्या असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शेंद्रा (छत्रपती संभाजीनगर) येथील वाल्मीकराव दळवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विद्यापीठाच्या पदवी परीक्षेत मास कॉपी केल्याबाबत**

**(६) * ६५६७२ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथील शेंद्रा गावातील वाल्मीकराव दळवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विद्यापीठाच्या पदवी परीक्षेत मास कॉपी केल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिक्षा संपल्यावर सायंकाळी विद्यार्थी ३०० रुपयांत कॉलेजमधून उत्तरपत्रिका नेऊन जवळच्या झेरॉक्स सेंटरवर पेपर लिहून पुन्हा सदर उत्तरपत्रिका गठ्ठयात ठेवत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाविद्यालय व संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

मार्च/एप्रिल, २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या बी.एस्सी. फोरेन्सिक सायन्स प्रथम ते सहावे सत्र परीक्षेसाठी औरंगाबाद ग्रामीण मधील वाल्मीकराव दळवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेंद्रा हे परीक्षा केंद्र देण्यात आले होते. सदर परीक्षा केंद्रावर दि.०४.०४.२०२३ रोजी गैरप्रकार सुरु असून गोंधळाबाबतच्या टिव्ही चॅनलवर तसेच दि.०५.०४.२०२३ रोजी वर्तमानपत्रात बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या. त्यानुषंगाने विद्यापीठाकडून सदर परीक्षा केंद्र बदलून दि.०६.०४.२०२३ पासूनच्या परीक्षा अन्य परीक्षा केंद्रावर घेण्यात आल्या होत्या.

तथापि, टिव्ही चॅनलवर तसेच वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने विद्यापीठाने तातडीने चौकशी समितीचे गठन केले. चौकशी समितीला या प्रकरणी तथ्य आढळून आलेले नसून सदरील तक्रार व बातम्या त्रयस्थ व्यक्तीच्या माध्यमातून घडवून आणल्याचा निष्कर्ष नोंदविला आहे. चौकशी समितीच्या निष्कर्षानुसार संपूर्ण प्रकरणाची शहानिशा न करता प्रसारमाध्यमांनी प्रसिद्धी देणे व विद्यापीठाची बदनामी करणे या बाबत सखोल चौकशी करण्याकरिता (FIR) दाखल करण्याची विनंती पोलीस स्टेशन, चिकलठाणा, जि. औरंगाबाद यांना दि.१७.०४.२०२३ च्या पत्रान्वये केलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील दुध व दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ रोखण्याबाबत

**(७) * ६५९६६ श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथे पोलिसांनी भेसळयुक्त पनीर बनविणा-या कारखान्यांवर छापे मारुन एकुण ५४६ किलोचा भेसळयुक्त पनीरचा साठा जप्त केल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास दुध व दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ आरोग्यासाठी घातक असल्यामुळे सदर भेसळ रोखण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दूध व दुग्धजन्य पदार्थांचे भेसळीवर आळा घालण्यासाठी प्रशासनामार्फत नियमितपणे, दूध भेसळ करणाऱ्यावर पाळत ठेवून किरकोळ विक्रेत्यांपासून ते उत्पादकांपर्यंत सर्व दूध व्यवसाय करणाऱ्या आस्थापनांच्या तपासण्या करून विश्लेषणासाठी दुधाचे नमुने घेण्यात येतात. भेसळीचा संशय आढळल्यास दुधाचा साठा जप्त करून तो नाशवंत असल्याने नष्ट केला जातो. दुधाच्या पिशव्या टॅम्परिंग करून होणाऱ्या भेसळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबवून संबंधित व्यक्ती विरुध्द पोलीसात गुन्हे नोंदविले जातात. शहरांमध्ये येणारे दूध मानकाप्रमाणे आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी नाका मोहीम राबविण्यात येते. तसेच, सदर नाका मोहिमेत दुधाची चाचणी त्याच ठिकाणी करून दूध कमी दर्जाचे आढळल्यास ते आलेल्या ठिकाणाकडे परत पाठविले जाते. धाडी जप्तीची कारवाई घेऊन दूध भेसळीवर नियंत्रण ठेवण्यात येते.

दुधात भेसळ आढळल्यास संबंधितांवर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**नवी मुंबईतील द्रोणागिरी नोड, मौजे नवघर (ता.उरण, जि.रायगड) येथील आय.ओ.टी. इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड एनर्जी सर्विस लि. कंपनी विना परवाना नाफ्ता साठवणुकीचा व्यवसाय करीत असल्याबाबत**

**(८) * ६४५६८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील द्रोणागिरी नोड, मौजे नवघर (ता.उरण, जि.रायगड) येथील आय.ओ.टी.इन्फ्रास्ट्रक्चर ॲड एनर्जी सर्विस ही कंपनी नाफ्ता साठवणुकीच्या परवान्याची मुदत संपलेली असतानाही अनधिकृतपणे नाफ्ता साठवणूक करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तेथील नागरीकांनी या कंपनीविरोधात शासनाकडे सातत्याने तक्रारी करुनही स्थानिक अधिकारी कंपनी प्रशासनाशी आर्थिक संगनमत करुन खोटे अहवाल पाठवून शासनाची दिशाभूल करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कंपनी व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) सदर कंपनीविरोधात ग्राम पंचायत, धुतुम, ता.उरण, जि.रायगड यांनी दि.०१.०२.२०१९ रोजी तक्रार केली आहे. तसेच श्री.राम दशरथ पाटील.ता.उरण, जि.रायगड यांनी तक्रारी केल्या आहेत.

(२) जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड यांच्या अहवालानुसार सदर तक्रारींच्या अनुषंगाने स्थानिक प्रशासनाने चौकशी करुन व तपासण्या करुन शासन नियमानुसार कार्यवाही केलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई विद्यापीठाच्यावतीने घेण्यात आलेल्या विधी अभ्यासक्रमाच्या परिक्षेबाबत**

**(९) * ६५७७५ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने घेतलेल्या पदव्युत्तर विधी शाखेच्या व्दितीय सत्र परीक्षेच्या निकालामध्ये अनेक विद्यार्थी हजर राहूनही त्यांना गैरहजर दाखवण्यात येणे, काही विद्यार्थ्यांची नावे गहाळ करणे, अनेक विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण दाखवणे, प्रश्नपत्रिका गहाळ होणे इत्यादी असंख्य त्रुटी आढळून आल्याचे दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आवश्यक ती उपाययोजना करणेबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.

मुंबई विद्यापीठाच्यावतीने घेण्यात आलेल्या पदव्युत्तर विधी शाखेच्या द्वितीय सत्राच्या परीक्षेचा निकाल दिनांक २० मे, २०२३ रोजी जाहीर झालेला आहे. महाविद्यालयांकडून विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या उपस्थिती अहवालानुसार जे विद्यार्थी परीक्षेला अनुपस्थिती होते त्यांनाच जाहीर झालेल्या निकालामध्ये अनुपस्थित दर्शविण्यात आले आहे. पदव्युत्तर विधी शाखेच्या द्वितीय सत्राच्या परीक्षेत विद्यार्थ्यांची नावे गहाळ होणे आणि प्रश्नपत्रिका गहाळ होणे असे प्रकार उद्‌भवले नाहीत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय महामार्गावरील चांदणी चौक-माले रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१०) * ६७४५० श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्गावरील चांदणी चौक-माले या ३० किलोमीटरच्या रस्त्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) आणि संबंधित ठेकेदार कंपनीकडून करण्यात येणारे काम सद्य:स्थितीत पूर्णतः बंद असल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे चांदणी चौक ते माले रस्त्यावर असलेल्या गावातील आणि कोकणात पर्यटनासाठी जाणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रस्त्याचे काम तातडीने पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर बाबत महामार्गाचे कंत्राटदार यांना दि.१८.११.२०२२ व दि. ०८.१२.२०२२ रोजी करारनाम्यानुसार नोटीस दिलेली होती. त्यानुसार दि.२८.१२.२०२२ रोजी कंत्राटदारासोबत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत कंत्राटदाराने काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार कंत्राटदाराने उप कंत्राटदार नेमून त्यांचे मार्फत काम प्रगतीपथावर आहे.

(४) सद्य:स्थितीत काम प्रगतीत आहे.

-----------------

## किनवट (जि.नांदेड) शहराला लागून असलेल्या पैनगंगा नदीवरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(११) * ६५४५९ श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) शहराला लागून असलेल्या पैनगंगा अभयारण्याच्या प्रारंभालाच पैनगंगा नदीवर मराठवाडा-विदर्भाला जोडणाऱ्या पुलाचे कठडे अतिवृष्टीमुळे वाहून गेले असून पुलावर मोठया प्रमाणात खड्डे पडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून तेथे मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) अतिवृष्टी मुळे सदर पुलाचे कठडे क्षतिग्रस्त झाले आहेत. पुलाजवळ आवश्यक सुचना फलक लावण्यात आले आहेत. पुलावरील खड्डे वेळोवेळी भरण्यात येतात.
(२) सदर पूलावर अपघात झाल्याची नोंद नाही.
(३) सदर पुलाच्या दुरुस्तीचे कामाकरिता रक्कम रु.३१६.८६ लक्ष चे मंजूर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम तात्काळ कार्यान्वयीत करणेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---------------------

## रत्नागिरी जिल्हयातील लोटे-परशुराम औद्योगिक वसाहतीमधील अनधिकृतरित्या सुरू असलेल्या गोशाळेचे स्थलांतर करण्याबाबत

**(१२)** * **६४९७८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील लोटे-परशुराम औद्योगिक वसाहतीमधील भूखंड क्र.ओ.एस.१९ वर श्री संत ज्ञानेश्वर माऊली जीवन मुक्तीधाम सेवा संस्थान (मु.पिंपळी, ता.चिपळूण) या संस्थेची गोशाळा सुरू असून संस्थेने सदर जागेवर अनधिकृतपणे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोशाळा मंजुरीसाठी जागे संदर्भात खोटी माहिती सादर करून शासनाकडून ७५ लाखांचे अनुदान घेतल्याबाबत सदर संस्थेला दिनांक १० जानेवारी,२०२३ पर्यंत खुलासा सादर करण्याची नोटीस आयुक्त, पशुसंवर्धन यांनी दिनांक ०३ जानेवारी,२०२३ रोजी वा त्या सुमारास बजावली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अनधिकृतरित्या सुरू असलेली गोशाळा स्थलांतरित करावी व अनधिकृत बांधकाम स्वखर्चाने १५ दिवसांत काढून टाकावे, अन्यथा सदर बांधकाम काढण्याची कार्यवाही करण्यात येईल, अशा आशयाची नोटीस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास संस्थेला बजावली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर संस्थेने केलेले अनधिकृत बांधकाम निष्कासीत करुन अनुदानाच्या रक्कमेची वसूली करण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) शासनाने दि.०९.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, पशुसंवर्धन यांना सदर संस्थेस लेखी नोटीस देऊन जागेसंदर्भात तसेच वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या विनियोगाबाबत त्याचप्रमाणे संस्थेसोबत आयुक्त पशुसंवर्धन यांच्या स्तरावरून करण्यात आलेल्या करारातील अटी व शर्तींचा भंग केल्याबाबत जबाब घेवून कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केले होते. शासनाने निर्देशित केल्यानुसार आयुक्त, पशुसंवर्धन यांनी सदर संस्थेस दि.०३.०१.२०२३ रोजी नोटीस बजावली व अवितरित असणारे अनुदान वितरीत करण्यात आले नाही.
उप-अभियंता एमआयडीसी चिपळून, यांनी २८/९/२०२२ रोजी सदर संस्थेस अतिक्रमण काढण्याबाबत पहिली नोटीस दिली आहे. तरीही सदर संस्थेने अतिक्रमण न काढल्यामुळे बांधकाम काढण्याची कारवाई करण्यात येईल व खर्च संस्थेकडून वसुल करण्यात येईल अशा आशयाची दुसरी नोटीस दि. २४/०१/२०२३ रोजी दिली आहे.
अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथे शीतपेये व आंबा पिकविण्यासाठी इथलीन रायपनरचा वापर होत असल्याबाबत

**(१३) * ६८९९८ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे शीतपेये कंपन्यांकडून तसेच आंबा पिकविण्यासाठी व्यापाऱ्यांकडून इथलीन रायपनरचा सर्रास वापर होत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे, काय,

(२) असल्यास, इथलीन रायपनरमुळे नागरिकांना कॅन्सर सारख्या दुर्धर आजार होण्याची शक्यता असल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात नाशिक येथील शारदा फ्रुट मार्केट कंपनी व दिंडोरी तालुक्यातील आकाश एजन्सी या कंपन्यांबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन इथलीन या औषधाच्या वापरावर निर्बंध घालण्याबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) हे खरे नाही.

(२) अन्न सुरक्षा मानके (Prohibition & Restrictions on sale) Regulation २०११ मधील नियमनानुसार कृत्रिमरित्या फळे पिकविण्यासाठी १०० पीपीएम पर्यंत इथिलिन गॅसचा वापर करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तथापि, अन्न सुरक्षा मानके (Prohibition & Restrictions on sale) Regulation २०११ मधील नियमनानुसार ठरवून दिलेल्या प्रमाणापेक्षा इथलीन गॅसचा जास्त वापर झाल्यास नागरिकांना कॅन्सर सारख्या दुर्धर आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यात अन्न व्यावसायिकांमध्ये कृत्रिम पद्धतीने फळे पिकविण्याकरीता इथिलीन रायपनर योग्य प्रमाणात व योग्य पद्धतीने वापर होतो किंवा कसे हे तपासण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत वेळोवेळी विशेष मोहिम राबवून फळांचे अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येतात. विश्लेषणामध्ये इथिलीन रायपनर प्रमाणापेक्षा जास्त आढळल्यास अन्न सुरक्षा मानके (Prohibition & Restrictions on sale) Regulation २०११ मधील नियमनानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आरटीई प्रवेशाचे शाळांचे १८०० कोटी रुपये शासनाकडे थकीत असल्याबाबत

**(१४) * ६६४१९ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत आर्थिक दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के राखीव असलेल्या जागांच्या शालेय शुल्काच्या प्रतिपूर्तीचे सुमारे १८०० कोटीं रुपयांचे अनुदान शासनाकडे थकित असल्यामुळे महाराष्ट्र इंग्लिश स्कुल ट्रस्टी असोसिएशन (मेस्टा) ने या शाळांमधील आरटीई प्रवेश रोखण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अगोदर प्रतिविद्यार्थी देण्यात येणारे रु.१७६७०/- अनुदान करोनाच्या पार्श्वभूमीवर ५० टक्के कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे आरटीई अंतर्गत भरण्यात येणाऱ्या सुमारे १ लाख जागांपैकी ३०% जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, थकीत आरटीई अनुदानाच्या प्रतिपूर्तीबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री शालेय शिक्षण यांचेकडे निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन थकीत आरटीई अनुदानाची प्रतिपूर्ती तसेच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१६-१७ ते सन २०२०-२१ पर्यंत रु.५९४.८६ कोटी रक्कमेची प्रतिपूर्ती करावयाची आहे. सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात रु. २०० कोटी इतकी तरतूद आरटीई करीता मंजूर करण्यात आली असून, प्रतिपूर्तीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) होय, हे खरे आहे.

विभागाच्या दि. १८.०५.२०२३ रोजीच्या पत्रानुसार कोविड कालावधी दरम्यान आरटीई प्रतिपुर्ती प्रति विद्यार्थी दर हा रू.१७,६७०/- वरून कमी करून रू.८०००/- इतका निश्चित करण्यात आला असून दि. ०६.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२२-२३ पासून पुन्हा पुर्ववत करण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही.

राज्याची आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेश क्षमता १,०१,८४६ असून त्यापैकी दि. ०५.०७.२०२३ पर्यंत ७९,७२६ विद्यार्थ्यांची (७८.२८ टक्के) प्रवेश प्रक्रीया पुर्ण झाली आहे.
(४) व (५) होय हे खरे आहे.

केंद्र शासनाकडून येणे बाकी असलेल्या रक्कमेची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आलेली असून शासन स्तरावर पाठपुरावा सुरु आहे. आरटीई-२५ टक्के अंतर्गत टप्पा-२ सुरु असून प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात धान्याची साठेबाजी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करुन धान्याचे भाव नियंत्रणात आणण्याबाबत

**(१५) * ६६२३१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यात अवकाळी पावसामुळे गहू, ज्वारी, बाजरी, डाळी,धान्य, कडधान्याच्या दरात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मुंबई, अकोला, लातूर व सोलापूर या शहरात तूर व उडिद डाळींची व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात साठेबाजी केली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात धान्यांच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी धान्याला किमान आधारभाव उत्पादन खर्चाच्या दीड पट करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धान्याच्या किंमती नियंत्रणात आणून साठेबाजी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही
(३) हे खरे आहे.

धान्याचे किमान आधारभाव उत्पादन खर्चाच्या दीड पट करण्याच्या मागणीबाबतची निवेदने प्राप्त झाली आहेत. राज्य कृषि मूल्य आयोग कार्यासनामार्फत राज्यातील प्रमुख पिकांच्या उत्पादन खर्चावर आधारित किंमती केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाकडे प्रस्तावित करण्यात येतात. केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोग, विविध पिकांच्या किमान आधारभूत किंमतीची शिफारस केंद्र शासनाकडे करते व त्या आधारे केंद्र शासन राष्ट्रीय पातळीवर आधारभूत मूल्य योजनेत समाविष्ट शेतमालाच्या आधारभूत किंमती निश्चित करुन जाहीर करीत असते. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या शेतमालाच्या आधारभूत किंमती सर्व राज्यांना लागू होतात.
(४) जास्त प्रमाणात दरवाढ होऊ नये यासाठी केंद्र शासनाच्या दि. ०२ जून, २०१३ रोजीच्या अधिसूचनेनुसार तूर व उडद डाळींचे घाऊक / किरकोळ व्यापारी तसेच मिलर्स / इम्पोटर्सकरीता साठा निर्बंध लागू करण्यात आले आहेत. सदर डाळीकरीताचे साठा निर्बंध दि. ३० ऑक्टोबर, २०२३ पर्यंत लागू राहणार आहेत. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या दि. १२ जून, २०१३ रोजीच्या अधिसूचनेनुसार गव्हाच्या घाऊक / किरकोळ व्यापारी, बिग चेन रिटेलर्स, प्रोसेसर्स करिता साठ्यावरील निर्बंध हे दि. ३१ मार्च, २०२४ पर्यंत लागू राहणार आहेत. तसेच, साठेबाजी करणाऱ्या व्यापाऱ्यांविरूध्द कठोर कारवाई करण्याच्या संबंधित यंत्रणांना सुचना देण्यात आल्या असून, केंद्र शासनाच्या उपरोक्त निर्देशानुसार राज्य शासनाच्या पुरवठा यंत्रणेकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना धान्याऐवजी देण्यात येणारी रक्कम अद्याप मिळाली नसल्याबाबत

**(१६) * ६८७५१ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये शासनाच्यावतीने शेतकऱ्यांना माहे जानेवारी, २०२३ पासून धान्याऐवजी रोख रक्कम खात्यात जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयानुसार बुलढाणा जिल्ह्यातील ७७०० तसेच राज्यात अन्य ठिकाणी देखील शेतकऱ्यांनी धान्याऐवजी रोख रक्कम मिळणेबाबत अर्ज केले असतांना अद्याप त्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा करण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बहुतांश जिल्हयातील हजारो शेतकऱ्यांना बँक खातेच मिळाले नसल्याने सदर योजनेपासून शेतकरी वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांच्या खात्यात रोख रक्कम जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) होय हे खरे आहे.

(२) बुलढाणा जिल्हयातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत समाविष्ट न झालेल्या (एपिएल) केशरी योजनेंतर्गत ७७०० लाभार्थींना रु.११,५५,०००/- रक्कम PFMS प्रणालीव्दारे त्यांचे बँक खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे आणि इतर १३ जिल्ह्यांमधील एकूण २,२१,७७९ एपीलएल शेतकरी लाभार्थ्यांच्या रु.९,१८,३७,०६१/- (रुपये नऊ कोटी अठरा लक्ष सदतीस हजार एकसष्ट फक्त) इतकी रक्कम बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. उर्वरित पात्र एपीएल शेतकरी लाभार्थ्यांच्या बँक खात्याची पडताळणी करून रोख रक्कम हस्तांतरण करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(४) व (५) उर्वरित पात्र एपीएल शेतकरी लाभार्थ्यांच्या बँक खात्यांचा तपशील संकलित करून, सदर खात्यांची पडताळणी करण्याची व त्यानुषंगाने रोख रक्कम हस्तांतरण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## डोंबिवली एमआयडीसी येथे सांडपाण्याची गळती होऊन होत असलेले प्रदुषण

**(१७) * ६७२३९ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली एमआयडीसी औद्योगिक विभाग फेज दोन मधील रासायनिक प्रक्रिया केलेले सांडपाणी हे भूमीगत पाईपलाईनद्वारे निवासी भागातील डॉ.नानासाहेब धर्माधिकारी रोडवरून ते औद्योगिक विभाग फेज एककडे जाताना रहिवाशी सोसायटी जवळील व्हॉल्वमधून रासायनिक सांडपाण्याची गळती होऊन मोठ्या प्रमाणात प्रदूषण व दुर्गंधी येत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एमआयडीसी निवासी भागात राहणाऱ्या नागरिकांचे आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत तेथील नागरिकांनी एमआयडीसी व कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे तक्रार करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.
डॉ. नानासाहेब धर्माधिकारी रोडवरुन ते औद्योगिक विभाग फेज-१ कडे जाणाऱ्या सांडपाणी वाहिनीवर भूखंड क्रं. RH-१२२ जवळ असलेल्या एअर व्हाल्व मध्ये कचरा अडकल्यामुळे त्यातून रासायनिक सांडपाण्याची गळती होत असल्याचे आढळुन आले होते. सदर एअर व्हॉल्वमधील अडकलेला कचरा ताबडतोब काढून गळती थांबविण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शैक्षणिक अभ्यासक्रमाला घेतलेले प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांना शुल्क परतावा न देणाऱ्या शैक्षणिक संस्था व संस्थाचालकांवर कारवाई करण्याबाबत

**(१८) * ६७२६८ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शैक्षणिक अभ्यासक्रमाला घेतलेले प्रवेश महिन्याभरात रद्द करणाऱ्या विद्यार्थ्यांना शुल्क फी परत देण्यास अनेक शिक्षण संस्था विलंब करत असल्याचे शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या फी ची रक्कम अडकून पडत असून त्यांचे आर्थिक नुकसान देखील होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैद्यकीय, व्यवस्थापन, वाणिज्य, अभियांत्रिकी इत्यादी शिक्षण देणाऱ्या संस्था प्रवेश रद्द केल्यानंतर शुल्क परतावा करण्याबाबत शासनस्तरावर कडक नियमावली करणेबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) तसेच, प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांना शुल्क परतावा न देणाऱ्या शैक्षणिक संस्था व संस्थाचालकांवर कारवाई करण्याबाबत शासन स्तरावर धोरण तयार केले आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.

यासंदर्भात उच्च शिक्षण संचालनालय, तंत्रशिक्षण संचालनालय, विद्यापीठे, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, तसेच वैद्यकिय शिक्षण विभागाकडे कोणतीही तक्रार प्राप्त नाही.
(२) लागू नाही.
(३) व (४) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून शुल्क परतावा धोरणासंदर्भात वेळोवेळी केलेल्या सूचनांनुसार विद्यापीठांकडून कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील वैद्यकीय अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनमान्य प्रवेश-माहितीपुस्तिकेतील नियमानुसार केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्यात येतात. सदर प्रवेश-माहितीपुस्तिकेतील मुद्दा क्रमांक १२.२ नुसार वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे मिळालेला प्रवेश हा संबंधित केंद्रिय परिषदेने निश्चित केलेल्या प्रवेशाच्या अंतिम दिनांकापूर्वी रद्द केल्यास निर्धारित रक्कम वजा करून उर्वरीत शुल्काचा परतावा उमेदवारास देण्यात येतो. परंतु काही उमेदवार हे प्रवेशाचा अंतिम दिनांक (कट ऑफ डेट) नंतर प्रवेश रद्द करतात अशा उमेदवारांकडून वैद्यकीय अभ्यासक्रमाची अमूल्य जागा वाया घालवल्या कारणाने प्रवेश- माहितीपुस्तिकेतील मुद्दा क्रमांक १६ नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.

तांत्रिक व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊन विहीत कट ऑफ डेट पर्यंत प्रवेश रद्द केल्यास विद्यार्थ्यांना प्रोसेसिंग शुल्क वजा करुन उर्वरीत शुल्क परत करणे संस्थांना बंधनकारक आहे. कट ऑफ डेटनंतर प्रवेश रद्द केल्यास शुल्क परतावा देय नाही. याबाबत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने प्रसिध्द केलेल्या माहितीपुस्तिकेतील नियम १५ मध्ये शुल्क परताव्याची तरतूद केलेली आहे.

महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन) अधिनियम २०१५ च्या तरतूदीनुसार पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी दिनांक २४.०४.२०१७ रोजी स्वतंत्र नियम अस्तित्वात आले आहेत. या नियमातील नियम १५ (ग) नुसार जर उमेदवाराने प्रवेशाच्या अंतिम दिनांकास किंवा त्यापूर्वी प्रवेश रद्द केल्यास शुल्काचा परतावा समुचित प्राधिकरणाने किंवा शासनाने वेळोवेळी निर्धारित केल्यानुसार देण्यात येईल. तसेच, नियम १५ (घ) नुसार उमेदवाराने प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर प्रवेश रद्द केला असेल तर, प्रतिभूती ठेव आणि तारण धनठेव वगळता कोणताही परतावा मिळण्यास उमेदवार पात्र नाही. संस्थांनी महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क याचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील नियमांचे पालन न केल्यास अशा संस्थांविरुध्द कलम २० नुसार कारवाई करण्याची तरतूद आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासनाने नुकत्याच जाहिर केलेल्या चुकीच्या संच मान्यतेमुळे विद्यार्थी शाळाबाहय होत असल्याबाबत

**(१९) * ६५६९७ श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने नुकत्याच जाहिर केलेल्या चुकीच्या संच मान्यतेमुळे २४ लाख विद्यार्थी शाळाबाहय व सुमारे ६० हजार शिक्षक अतिरिक्त ठरण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अस्वभाविक हिंदी, गुजराती, सिंधी, कन्नड व उर्दु या शाळा कमी पट संख्येमुळे एकतर बंद होत आहेत किंवा येथील शिक्षक अतिरीक्त ठरत असल्यामुळे संच मान्यतेसाठी दिनांक ०२ फेब्रुवारी, २००९ च्या निर्णयानुसार डोंगरी १५ ग्रामीण २५ ही विद्यार्थी अट लागू करावी अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, राज्यात संचमान्यता ठरविताना कमी पटसंख्येमुळे मोठया प्रमाणावर शिक्षक अतिरिक्त ठरुन बेरोजगार होत असल्याने या संच मान्यता दिनांक ३१ मार्च, २०२३ ची पट संख्या ग्राहय धरुन करण्यात याव्यात अशी शैक्षणिक क्षेत्रातून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

(२) असे निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) या संदर्भात वस्तुस्थितीदर्शक अभिप्राय मागविण्यात आले असून सदर अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती ते परतवाडा (जि.अमरावती) मार्गावरील वलगाव येथील पेढी नदीवरील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(२०) * ६६९२० ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती ते परतवाडा (जि.अमरावती) मार्गावरील वलगाव येथील पेढी नदीवरील ब्रिटीशकालीन पूल धोकादायक झाला असल्याचे माहे मे, २०२३ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पूलाचे सिमेंटचे कठडे तुटले असल्यामुळे येथे अपघात होऊन जिवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन पूलाची तातडीने दुरुस्ती करणे तसेच येथे सूचनाफलक लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर पुलाच्या संरचनात्मक परीक्षणात सुचविलेल्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली असून सद्यस्थितीत पुल वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय विश्रामगृहांच्या दुरवस्थेबाबत**

**(२१) * ६४८७२ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांश शासकीय विश्रामगृहाची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असल्याची बाब दिनांक २६ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विश्रामगृहांच्या सुविधांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यात येत असूनही ही विश्रामगृहे राहण्यास योग्य नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अनेक ठिकाणी विशेषत: मुंबईतील शासकीय विश्रामगृहांमध्ये काही व्यक्तींना विनाआरक्षण खोल्या दिल्या जात असल्याचे दिनांक २ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय विश्रामगृहे अद्ययावत, सुविधापुर्ण व स्वच्छ ठेवणे, विनाआरक्षण खोल्यांचे वाटप न करणेबाबत तसेच या प्रकरणात दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. मात्र, काही विश्रामगृहांची दुरूस्ती प्रगतीत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.